# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

निविदा अर्ज

## कंत्राटी पध्दतीने सुरक्षा सेवा पुरविण्याबाबतचा निविदा अर्ज

सन २०२६-२०२७

संशोधन संचालक,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी, जि. अहिल्यानगर

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,

राहुरी, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) (भारत) ४१३ ७२२

---

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील राहुरी यांचे विभागाकरीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षासेवा पुरविण्याबाबतचा ई-निविदा अर्ज.

| | | |
|---|---|---|
| १. | ई-निविदा अर्ज घेणाऱ्या निविदाधारकाचे नाव व पत्ता | |
| २. | दुरध्वनी क्रमांक/ भ्रमणदुरध्वनी क्रमांक | |
| ३. | ई-निविदा ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत | १७/०८/२०२६ पर्यंत |
| ४. | ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा वेळापत्रका नुसार |

स्वाक्षरी/-

संशोधन संचालक,

महात्मा फुले कृषि विद्यापीठ,

राहुरी, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) (भारत) ४१३ ७२२

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ,**
**राहुरी- ४१३ ७२२**

## लखोटा क्र.०१

ई-निविदा सुचना - /२०२६

प्रति,

मा. संशोधन संचालक,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी, जि. अहिल्यानगर.

कामाचे नावः कंत्राटी सुरक्षा सेवा पुरविणे
संदर्भ : .............................. वर्तमान पत्रातील जाहिरात दिनांक ............... नुसार.

मा. महोदय,
उपरोक्त संदर्भाधीन प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सुचनामधील अटी व शर्ती वाचून, समजून घेवून मी खाली सही करणार पुढील प्रमाणे ई-निविदा सादर करीत आहे. सोबत जोडलेली कागदपत्रे खालील प्रमाणे.

१. निविदा सुचनेप्रमाणे पुर्तता करणारी सर्व कागदपत्रे.
२. कंत्राटदार संस्था/सुरक्षा एजन्सीचा माहितीचा गोषवारा.
३. अनुभव

### प्रमाणपत्र

मी, श्री/ श्रीमती. मी, ------------------------------------------------------------------------------------------------

(पदनाम) ---------------------------------- खाली सही करणार असे नमूद करतो/ करते की, मी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहिल्यानगर यांच्या ई-निविदा सुचना क्रमांक दिनांक / /२०२६ अन्वये सुरक्षा पुरविण्याची ई- निविदा भरुन दाखल करीत आहे. उपरोक्त ई-निविदा अर्जात नमूद केलेली सर्व माहिती आणि पुराव्यादाखल जोडलेली सर्व प्रमाणपत्रे ही माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहेत, अशी मी हमी देत आहे. यात कोणतीही बाब असत्य आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास कोणत्याही स्तरावर माझी ई-निविदा अपात्र ठरविण्यात येईल, याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच मी असेही नमूद करतो/करते की, उपरोक्त जाहिराती मधील निविदा संबंधी सर्व नियम व अटी मी काळजीपूर्वक वाचलेल्या असुन, त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. मा. कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहिल्यानगर यांनी ई-निविदा वैध/अवैध ठरविण्याबाबतचा घेतलेला निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील, याची मला पुर्ण जाणीव आहे.

सही
स्वाक्षरी करणाऱ्यांचे नाव
हुद्दा
संस्थेचे नाव
शिक्का

स्थळः
दिनांक :

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

**१२. अनुभव (पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास स्वतंत्र प्रपत्र जोडावे)**

| अ.क्र. | सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या कार्यालयाचे संस्थेचे नाव | सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाची संख्या | कराराची मुदत | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**सही**
**स्वाक्षरी करणाऱ्यांचे नाव**
**हुद्दा**
**संस्थेचे नाव**
**शिक्का**

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

# लखोटा क्रमांक १

ई-निविदासुचना नुसार पुर्तता करणारी सर्व कागदपत्रे व निविदा सादर करणाऱ्या संस्था/एजन्सीबद्दल माहितीचा गोषवारा खालील प्रमाणे

| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | ई-निविदा सादर करणाऱ्या संस्था/ सुरक्षा रक्षक एजन्सीचे नाव | |
| २. | सुरक्षा रक्षक एजन्सीचे संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता व दुरध्वीन/भ्रमणदुरध्वनी क्रमांक | |
| ३. | सुरक्षा रक्षक एजन्सीचे संस्था चालकाचे नाव व दुरध्वीन/भ्रमणदुरध्वनी क्रमांक | |
| ४. | संस्था नोंदणी प्रमाणपत्र (मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ व १९६१ अन्वये नियम ग आणि ह व्यतिरिक्त नोंदणी प्रमाणपत्र. | |
| ५. | संस्थेचे खाजगी सुरक्षा एजन्सी (नियमन) अधिनियम, २००५ अंतर्गत परवान्याची प्रत. | |
| ६. | संस्थेचे राज्य कामगार गटविमा अधिनियम १९४८ नुसार कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) नोंदणी प्रमाणपत्र. | |
| ७. | सहाय्यक कामगार कल्याण आयुक्त यांचे संस्थेचे वैध परवाना. | |
| ८. | संस्थेचे सन २०२३-२०२४, २०२४-२०२५ व २०२५-२०२६ या कालावधीतील कामात कमी एका आर्थिक वर्षाचे सनदी लेखापालाचे ५० लाख किंवा पेक्षा जास्त उलाढालीचे (UDIN) नंबरसह प्रमाणपत्र. | |
| ९. | संस्थेचे कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ नुसार भविष्य निर्वाह निधी (EPFO) नोंदणी प्रमाणपत्र. | |
| १०. | महाराष्ट्र शासनाच्या विक्रीकर विभागाचे व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (P.T.) | |
| ११. | महाराष्ट्र शासन कामागार विभागाकडील सक्षम अधिकारी यांच्याकडील प्राप्त वेध नोंदणी प्रमाणपत्र. | |
| १२. | भारत सरकारच्या वस्तु व सेवा कर विभागाचे संस्थेचे वस्तु व सेवा कर (GST) प्रमाणपत्र. | |
| १३. | भारत सरकारच्या आयकर विभागाचे पॅन व टॅन (PAN आणि TAN) ची छायांकित प्रत. | |
| १४. | मा. पोलिस अधिक्षक यांनी सन २०२५-२०२६ यावर्षी निविदा प्रसिध्द होईल या तारखेपर्यंतचे वैध चारित्र पडताळणी अहवाल. | |
| १५. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षांत (२०२३-२०२४, २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६) ७५ सुरक्षा रक्षक प्रतिदिन पुरवत असेलबाबत केलेल्या कामाच्या वर्क ऑर्डरच्या छायांकित प्रत. | |
| १६. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षात (२०२३-२०२४, २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६) मध्ये केलेल्या कामाच्या ७५ सुरक्षा रक्षक प्रतिदिन पुरवत असेलबाबत शासकीय/निमशासकीय/ महामंडळे/ नामांकित खाजगी संस्था यांचेकडील अनुभव प्रमाणपत्र. | |
| १७. | ई-निविदा प्रसिध्द होणेचे दिनांकापर्यंत ठेकेदाराचे नांव/संस्थेचे नांव शासनाचे तसेच अन्य कोणत्याही संस्थेचेकडे काळया यादीत नसलेबाबतचे तहसीलदार/नोटीरी यांचे समक्ष रु.१००/- मात्रचे बॉन्ड पेपर वरील प्रतिज्ञापत्र. | |
| १८. | संस्थेचे मागील लगतच्या तीन आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र (२०२३-२०२४, २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६) च्या प्रती. | |

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

| | | |
|---|---|---|
| १९. | रु. २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) बयाणा रक्कम व कोरे निविदा रुपये १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) ऑनलाईन मा. नियंत्रक म.फु.कृ.वि., राहुरी यांच्या नावे भरणा केलेल्या रकमेची पावती ऑनलाईन अपलोड करावी. | |
| २०. | संस्थेचे (GST 3B Return) भरल्याच्या मागील लगतच्या तीन वर्षाच्या (२०२३-२०२४, २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६) चलनाच्या प्रती | |
| २१. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षाच्या (२०२३-२०२४, २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६) सनदीलेखापाल यांनी प्रमाणित केलेले ताळेबंद (बॅलन्ससीट) च्या प्रती. | |
| २२. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षाच्या (२०२३-२०२४, २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६) ESIC भरणा चलनाच्या प्रती | |
| २३. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षाच्या (२०२३-२०२४, २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६) कर्मचारी भविष्य निधी भरणा चलनाच्या प्रती. | |
| २४. | ई-निविदा सोबत इसारा रकमेचा जोडलेला रु. .......................... चा तपशील (ऑनलाईन पावती)<br>बॅकेचे नाव :- ............................................<br>पावती नंबर :- ............................................<br>दिनांक :- ................................................ | |

सही :-
स्वाक्षरी करणाऱ्यांचे नाव :-
हुद्दा :-
संस्थेचे नाव :-
शिक्का :-

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

लखोटा क्र. ०२ (दरपत्रक)

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी - ४१३ ७२२

## ई-निविदा दरपत्रक नमुना

प्रति,

मा. संशोधन संचालक,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहिल्यानगर

**कामाचे नाव:** कंत्राटी सुरक्षा सेवा पुरविणे, कामाची कालावधी ०१ सप्टेंबर २०२६ ते ३१ जुलै २०२७ (११ महिने)

**संदर्भ:** ऑनलाईन निविदा क्र. ------------------------------ दिनांक / /२०२६.

## लखोटा क्र. ०२ (दरपत्रक)

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | प्रति दिन एका सुरक्षा रक्षकांचा एका पाळीचा कामाचा सर्व्हिस चार्ज दर रुपया मध्ये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | तपशील | | | |
| १. | आठ तासाला १ या प्रमाणात कोणत्या पाळीत कंत्राटी सुरक्षा पर्यवेक्षकांच्या नियोजित कंत्राटी सेवा प्रती दिन पुरविणे सर्व्हिस चार्ज दर रुपया मध्ये. (सर्व करांसहित) | झोन | **दर (रु) (सर्व करांसहित)** दर प्रतिव्यक्ती प्रति दिन सर्व्हिस चार्जची रक्कम फक्त रुपया मध्ये नमुद करावी. चुकीची माहिती भरलेले फॉर्म बाद करण्यात येतील. | **एकुण (रु)** | **अक्षरामध्ये** |
| | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | ३ | | | |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव | ३ | | | |
| | | **एकुण** | | | |
| २. | आठ तासाला १ या प्रमाणात कोणत्या पाळीत कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या नियोजित कंत्राटी सेवा प्रती दिन पुरविणे **सर्व्हिस चार्ज दर रुपया मध्ये** .(सर्व करांसहित) | झोन | **दर (रु) (सर्व करांसहित)** दर प्रतिव्यक्ती प्रति दिन सर्व्हिस चार्जची रक्कम फक्त रुपया मध्ये नमुद करावी. चुकीची माहिती भरलेले फॉर्म बाद करण्यात येतील. | **एकुण (रु)** | **अक्षरामध्ये** |
| | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | ३ | | | |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव | ३ | | | |
| | | **एकुण** | | | |

| | |
|---|---|
| स्थळ : | सही |
| दिनांक : | स्वाक्षरी करणाऱ्यांचे नाव |
| | हुद्दा |
| | संस्थेचे नाव |
| | शिक्का |
| **टिप: १) तांत्रिक लखोटयानुसार अर्हताप्राप्त निविदाधारकांनी लखोटा क्र. २ मध्ये दरपत्रक भरावयाचा नमुना** | |

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

महाराष्ट्र शासन
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

दुरध्वनी क्र. ०२४२६- २४३२७१
ई-मेल:mpkv243271@gmail.com

पत्ता : मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जिल्हा अहिल्यानगर पिन- ४१३ ७२२.

अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी विभागाकरीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक पुरविणे संदर्भात ई-निविदांबाबतच्या अटी व शर्ती :-

१. ऑनलाईन ई-निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख : १७/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत असून उघडण्याची तारीख दिलेल्या निविदा वेळापत्रकानुसार राहील.
२. ई-निविदेसोबत बयाणा रकमेची पुर्तता केली नसल्यास ई-निविदाचा विचार केला जाणार नाही.
३. आवश्यक ती माहिती व त्या अनुषंगाने लागणारी खालील कागदपत्रे निविदेसोबत खालील प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने www.mahatenders.gov.in या वेबसाईडवर अपलोड करावीत. तथापि ई-निविदा उघडते समयी सर्व मुळ कागदपत्रे निविदाधारकाकाडे असणे आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संस्था नोंदणी प्रमाणपत्र (मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ व १९६१ अन्वये नियम ग आणि ह व्यतिरिक्त नोंदणी प्रमाणपत्र. | २. | संस्थेचे खाजगी सुरक्षा एजन्सी (नियमन) अधिनियम, २००५ अंतर्गत परवान्याची प्रत. |
| ३. | संस्थेचे राज्य कामगार गटविमा अधिनियम १९४८ नुसार कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) नोंदणी प्रमाणपत्र. | ४. | सहाय्यक कामगार कल्याण आयुक्त यांचे संस्थेचे वैध परवाना. |
| ५. | संस्थेचे सन २०२३-२०२४, २०२४-२०२५ व २०२५-२०२६ या कालावधीतील कोणत्याही एका आर्थिक वर्षाचे सनदी लेखापालाचे ५० लाख किंवा पेक्षा जास्त उलाढालीचे (UDIN) नंबरसह प्रमाणपत्र. | ६. | संस्थेचे कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ नुसार भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र. |
| ७. | महाराष्ट्र शासनाच्या विक्रीकर विभागाचे व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र. (P.T.) | ८. | महाराष्ट्र शासन कामागार विभागाकडील सक्षम अधिकारी यांच्याकडील प्राप्त वैध नोंदणी प्रमाणपत्र. |
| ९. | भारत सरकारच्या वस्तु व सेवा कर विभागाचे संस्थेचे वस्तु व सेवा कर (GST) प्रमाणपत्र. | १०. | भारत सरकारच्या आयकर विभागाचे पॅन व टॅन (PAN आणि TAN) ची छायांकित प्रत. |
| ११. | मा. पोलिस अधिक्षक यांनी सन २०२५-२६ यावर्षी निविदा प्रसिध्दी च्या तारखेपर्यंतचे वैध असलेले चारित्र पडताळणी अहवाल. | १२. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षात (२०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) मध्ये ७५ सुरक्षा रक्षक प्रतिदिन पुरवत असलेबाबत केलेल्या कामाच्या वर्क ऑर्डरच्या छायांकित प्रती |
| १३. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षात (२०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) मध्ये केलेल्या कामाच्या ७५ सुरक्षा रक्षक प्रतिदिन पुरवत असेलबाबत शासकीय/निमशासकीय/ महामंडळे/ नामांकित खाजगी संस्था यांचेकडील अनुभव प्रमाणपत्र. | १४. | ई-निविदा प्रसिध्द होणेचे दिनांकापर्यंत ठेकेदाराचे नांव/संस्थेचे नांव शासनाचे तसेच अन्य कोणत्याही संस्थेकडे काळया यादीत नसलेबाबतचे तहसीलदार/नोटीरी यांचे समक्ष रु.१००/- मात्रचे बॉन्ड पेपर वरील प्रतिज्ञापत्र. |

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि.,राहुरी

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | संस्थेचे मागील लगतच्या तीन आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र (२०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) च्या प्रती. | १६. | रु. २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) बयाणा रक्कम व कोरे निविदा रुपये १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) ऑनलाईन मा. नियंत्रक म.फु.कृ.वि., राहुरी यांच्या नावे भरणा केलेल्या रकमेची पावती ऑनलाईन अपलोड करावी. |
| १७. | संस्थेचे (GST 3B Return) भरल्याच्या लगतच्या तीन मागील वर्षाच्या (२०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) चलनाच्या प्रती | १८ | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षाच्या (२०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) सनदीलेखापाल यांनी प्रमाणित केलेले ताळेबंद (बॅलन्ससीट) च्या प्रती. |
| १९. | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षाच्या (२०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) ESIC भरणा चलनाच्या प्रती | २० | संस्थेचे मागील लगतच्या तीन वर्षाच्या (२०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) कर्मचारी भविष्य निधी भरणा चलनाच्या प्रती |

४. निविदा बैठकीसाठी उपस्थित राहतांना निविदाधारकांनी स्वतःचे ओळखपत्रासह उपस्थित रहावे किंवा प्रतिनिधी उपस्थित असल्यास प्रतिनिधीने स्वतःचे ओळखपत्रासह अधिकृत प्रतिनिधी असले बाबतचे संबंधित एजन्सीचे अधिकृत लेटर हेडवर पत्र असणे आवश्यक आहे.

५. सुरक्षा एजन्सीने नेमलेल्या सुरक्षा रक्षकांवर त्यांचे पर्यवेक्षकांमार्फत नियंत्रण व देखरेख केली पाहिजे.

६. सुरक्षा एजन्सीने पुरविलेले सुरक्षा व सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या सेवा केवळ तात्पुरत्या स्वरुपात असतील. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक आणि विद्यापीठ यांचेमध्ये मालक व नोकर असा संबंध राहणार नाही. कंत्राटी सुरक्षा रक्षक आणि सुरक्षा पर्यवेक्षक यांना या कार्यालयाकडे कायमस्वरुपी नियुक्ती करिता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही. तथापी विद्यापीठचे प्रशासन/ नियंत्रण अधिकारी यांचे सुरक्षेबाबतचे सर्व आदेश पाळणे बंधनकारक राहतील.

७. सुरक्षा एजन्सीने पुरविलेले सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांनी विद्यापीठ प्रक्षेत्रावर कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन अथवा शिस्तीस बाधा येईल असे कोणतेही वर्तन केल्याचे आढळून आल्यास त्यांना सुरक्षा एजन्सी मार्फत तात्काळ कमी करण्यात येईल. कमी केलेले सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक पुनःश्च सुरक्षा एजन्सीने विद्यापीठास पुरवू नये. तसेच अशा प्रकारचे गैरवर्तन घडल्यास कंत्राट विना-नोटीस रद्द करण्याचा हक्क विद्यापीठास राहील.

८. विद्यापीठ कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या कोणत्याही सोयी व सुविधा या सुरक्षा एजन्सीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांना देय असणार नाहीत.

९. सुरक्षा एजन्सीकडुन/सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षकांकडुन विद्यापीठ शिस्तीला, मालमत्तेला नुकसान अथवा इतरांच्या जीवितास धोका पोहोचणार नाही, याची जबाबदारी सुरक्षा एजन्सीची राहील सुरक्षा एजन्सीच्या सुरक्षा रक्षकांकडून विद्यापीठाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास अथवा कोणच्याही जीवितास धोका झाल्यास, मालमत्तेची चोरी झाल्यास दुरुस्ती व नुकसान भरपाई करुन देण्याची अथवा संबंधित व्यक्तीस भरपाई देण्याची जबाबदारी सुरक्षा एजन्सीची राहील. नुकसान भरपाई न दिल्यास नुकसान भरपाईची रक्कम सुरक्षा एजन्सीच्या विद्यापीठाकडील अनामत/सुरक्षा रक्कम अथवा देयकातून कपात केली जाईल व विद्यापीठाकडुन संबंधित व्यक्तीस अदा केली जाईल. विद्यापीठाने नियुक्त केलेल्या सुरक्षा एजन्सीने या बाबतचे हमीपत्र रु.५०० चे स्टॅम्पवर नोटरी करुन विद्यापीठास सादर करावे.

१०. निविदामध्ये नमुद केलेले दर विद्यापीठाने मान्य केल्यानंतर त्यात कराराची कालावधी संपेपर्यंत कोणत्याही सबबीवर बदल केले जाणार नाहीत. परंतु शासनाने अनुसुचित उद्योगात नमुद केले प्रमाणे किमान वेतनानुसार महागाई भत्ता लागु करण्यात येईल.

११. सुरक्षा एजन्सी यांनी महिना भरल्यानंतर पुढील महिन्याच्या पाच तारखेपर्यंत त्यांच्या कामाचे देयक हजेरीपटासह विद्यापीठाच्या संबंधित खाते प्रमुख यांचे मार्फत तपासून दाखल करावे.

१२. सदर देयकाची रितसर पडताळणी केल्यानंतर देयकाची मंजुर रक्कम कंत्राटदारास अदा केली जाईल. दरमहा देयकाची रक्कम विद्यापीठाकडून अदा करण्यास उशीर झाला तर शासकीय कर, सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षकांचे वेतन व कामगार भविष्य निधी, कर्मचारी राज्य विमा निगम व शासकिय नियमानुसार भरणा दरमहा ०५ तारखेच्या आत सुरक्षा एजन्सीने स्वतःच्या

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

भांडवलातुन करावे. त्यानंतर विद्यापीठ महिना अखेरपर्यंत त्यांचे खात्यावर दरमहा देयकाची रक्कम अदा करेल त्या अनुषंगाने होणारी दंड आकारणी देणे ही सर्वस्वी जबाबदारी सुरक्षा एजन्सीवर राहील.

१३. सुरक्षा एजन्सीने निविदा मंजूर झाल्यानंतर कारारनामा करतेवेळी त्यांचेमार्फत पुरविलेल्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांची संपुर्ण नावे, पत्ते, रहिवासी दाखला, आधारकार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्र, दोन पासपोर्ट साईज फोटो, पोलीस तपासणी अहवाल, वैद्यकीय प्रमाणपत्र (तालुका वैद्यकीय अधिकार) वगैरे देणे गरजेचे आहे. या बाबतची माहिती खालील विहित नमुन्यात कागदपत्रासह सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | नाव व पत्ता | वय | पदनाम | आधारकार्ड क्रमांक | शैक्षणिक प्रमाणपत्र | पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल | वैद्यकीय प्रमाणपत्र | शिक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

१४. सुरक्षा एजन्सीने सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांची नेमणूक करतांना त्यांना फायर फायटींग प्रशिक्षण, प्रथमोपचार प्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, VIP Escorting, VIP सुरक्षा प्रशिक्षण व जमावावर नियंत्रण ठेवणेचे मान्यप्राप्त संस्थेकडुन प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. त्याबाबतचे प्रमाणपत्र १ (एक) महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील. याबाबतचा सराव किमान तीन (०३) महिन्यातुन करुन घेणे आवश्यक राहील. महिन्यातुन दोन वेळेस परेड घेण्यात येऊन दरवेळी सुरक्षेच्या कामकाजाबाबत सुचना देण्यात याव्यात.

१५. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांच्या कुठल्याही प्रकारच्या अपघातप्रसंगी सुरक्षा एजन्सीस विद्यापीठाकडून वैद्यकीय कारणास्तव आर्थिक मदत व नुकसान भरपाई मिळणार नाही. अपघातप्रसंगी सुरक्षा रक्षकांना/पर्यवेक्षकांना नुकसान भरपाई देण्याची सर्वस्वी जबाबदारी सुरक्षा एजन्सीची राहील. त्याच्या कर्मचाऱ्यांसाठी कर्मचारी राज्य विमा निगम चा फायदा देणे बंधनकारक राहील तसेच सर्व सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांना ई-पहचान कार्ड देणे बंधनकारक राहील. सुरक्षा कर्मचाऱ्यांची कर्मचारी राज्य विमा निगम यांचे कडील पॉलिसी विद्यापीठास ०१ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

१६. सुरक्षा सेवा पुरविणे बाबतचा कालवधी ११ महिने करीता राहील तथापि ११ महिन्यानंतर सुरक्षेच्या कामाचा आढावा घेऊन सुरक्षा एजन्सीचे कामकाज समाधानकारक असल्यास पुढील ११ महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात येईल.

१७. विद्यापीठाला सदर कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक वाटल्यास कोणतेही कारण न देता, मुदतपूर्व विना नोटीस व विना नुकसान भरपाई कंत्राट रद्द करण्याचा हक्क विद्यापीठ राखुन ठेवीत आहे.

१८. ई-निविदेच्या तांत्रिक व वित्तीय लिफाफा उघडणेच्या वेळापत्रकात ऐनवेळी बदल करण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील.

१९. वित्तीय लिफाफ्यात लखोटा क्र.०२ मध्ये प्रति व्यक्ती प्रति दिन सर्व्हिस चार्जची फक्त रक्कम रुपया मध्ये नमुद करावी. चुकीची माहिती भरलेले फॉर्म बाद करण्यात येतील.

२०. ई-निविदाधारकांचे सेवा शुल्क (Service Charge) समान असल्यास ई-निविदाधारकांमध्ये खालीलप्रमाणे तांत्रिक मुल्याकन करण्यात येईल.

**१) मागील तीन वर्षात (२०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) मध्ये सरासरी पुरविलेल्या सुरक्षा रक्षकांची संख्या:-**

| **अ.क्र.** | **सुरक्षा रक्षक संख्या** | **गुण** |
|---|---|---|
| १. | ७५ ते १०० | १० |
| २. | १०१ ते २०० | २० |
| ३. | २०१ ते ४०० | ३० |
| ४. | ४०१ व त्यापेक्षा जास्त | ४० |

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

२) सुरक्षा एजन्सीने एका कार्यादेशामध्ये ७५ पेक्षा जास्त सुरक्षा रक्षक वेगवेगळया आस्थापनांना पुरविले बाबतच्या कार्यादेशांची संख्या :

| अ.क्र. | आस्थापनेला पुरविलेल्या कार्यादेशांची संख्या | गुण |
|---|---|---|
| १. | १ ते ५ | १० |
| २. | ५ ते १० | २० |
| ३. | १० व त्यापेक्षा अधिक | ३० |

३) मागील १ वर्षांतील सरासरी उलाढाल

| अ.क्र. | वार्षिक उलाढाल | गुण |
|---|---|---|
| १. | १ कोटी ते २ कोटी पर्यंत | १० |
| २. | २ कोटी ते ५ कोटी पर्यंत | २० |
| ३. | ५ कोटी पेक्षा जास्त | ३० |

२१. निविदा धारकाने सर्व कागदपत्रे अपलोड न केल्यास निविदाधारकास अपात्र करण्यात येईल तसेच ई-निविदा वेळापत्रकाचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही निविदाधारकांचे कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

२२. ई-निविदा मंजूर करणे, ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणे, स्थागित करणे याबाबचे सर्व अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणत्याही प्रकाराच्या तक्राराची दखल घेतली जाणार नाही.

२३. सुरक्षा एजन्सीने नेमलेल्या कंत्राटी सुरक्षा रक्षक व कंत्राटी सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) व गट विमा काढणे बंधनकारक आहे.

## ब) सुरक्षा रक्षक व कामाचे स्वरुप :-

१. कंत्राटदाराकडुन विद्यापीठाला पुरविण्यात येणारे सुरक्षा रक्षकांची निवासाची व्यवस्था करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहणार नाही.

२. सुरक्षा रक्षकास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषाचे ज्ञान अवगत असावे. सुरक्षा रक्षकांचे वय २० ते ५५ वर्षे च्या दरम्यान असावे आणि माजी सैनिकांसाठी उच्चतम वयोमर्यादा २ वर्षासाठी शिथिल राहील. सुरक्षा एजन्सीकडून विद्यापीठाला पुरविण्यात येणारे सुरक्षा रक्षक अनुभवी व शारिरीकदृष्ट्या सक्षम असावेत. सुरक्षा कर्मचाऱ्यांची पात्रता पुढीलप्रमाणे असावी.

**१. किमान शारिरीक पात्रता:-**

| प्रकार | उंची (सें.मी.) | छाती न फुगवता (सें.मी.) | छाती फुगवून (सें.मी.) | किमान वजन (किलो) |
|---|---|---|---|---|
| पुरुष | १६५ | ७९ | ८४ | ५५ |
| स्त्री | १६० | | | ४८ |

**२. शैक्षणिक पात्रता:**

| अ.क्र. | प्रकार | शिक्षण |
|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण |

**३. शारिरीक क्षमता**

१. पुरुष यांच्यासाठी ४०० मीटर धावणे (३० गुण)

अ. २ मिनिटे २५ सेकंद किंवा त्यापेक्षा कमी : ३० गुण

ब. २ मिनिटे २६ सेकंद ते २ मिनिटे ३० सेकंद : २५ गुण

क. २ मिनिटे ३१ सेकंद ते २ मिनिटे ३५ सेकंद : २० गुण

संशोधन संचालक

ड. २ मिनिटे ३६ सेकंद ते २ मिनिटे ४० सेकंद : १५ गुण

ई. २ मिनिटे ४१ सेकंद ते ३ मिनिटे : १० गुण

इ. ३ मिनिटे किंवा त्यापेक्षा जास्त : ० गुण

२. पुरुष यांच्यासाठी गोळा फेकणे (१५ गुण- ७.२६० किलो वजनाचा गोळा)

अ. ७.०० मीटर किंवा जास्त : १५ गुण

ब. ७.०० मीटर ते ६.५० मीटर : १२ गुण

क. ६.५० ते ६.०० मीटर : ९ गुण

ड. ६.०० ते ५.५० मीटर : ०६ गुण

ई. ५.०० मीटर पेक्षा कमी : ० गुण

३. पुरुष यांच्यासाठी पुल-अप्स (१५गुण)

अ. १० पुल-अप्स किंवा त्यापेक्षा जास्त : १५ गुण

ब. ०९ पुल-अप्स : १२ गुण

क. ०८ पुल-अप्स : ०९ गुण

ड. ०७ पुल-अप्स : ०६ गुण

ई. ०५ पुल-अप्स : ०३ गुण

इ. ०५ पुल-अप्स पेक्षा कमी : ० गुण

४. महिला यांच्यासाठी २०० मीटर धावणे (३० गुण)

अ. १ मिनिट ४० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी : ३० गुण

ब. १ मिनिटे ४१ सेकंद ते १ मिनिट ४५ सेकंद : २५ गुण

क. १ मिनिट ४६ सेकंद ते १ मिनिट ५० सेकंद : २० गुण

ड. १ मिनिट ५१ सेकंद ते १ मिनिट ५५ सेकंद : १५ गुण

ई. १ मिनिट ५६ सेकंद ते २.०० मिनिटे : १० गुण

इ. २.०० मिनिटे पेक्षा जास्त :० गुण

५. महिला यांच्यासाठी गोळाफेक (३० गुण - ४ किलो वजनाचा गोळा)

अ. ५.०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त : ३० गुण

आ. ४.५० मीटर ते ५.०० मीटर : २५ गुण

ई. ४.०० मीटर ते ४.५० मीटर: २० गुण

इ. ३.५० मीटर ते ४.०० मीटर : १५ गुण

उ. ३.०० मीटर ते ३.५० मीटर : १० गुण

ऊ. २.५० मीटर ते ३.०० मीटर : ०८ गुण

ए. २.०० मिनिटे ते २.५० मीटर :०५ गुण

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

ऐ. २.०० मिनिटे पेक्षा कमी : ० गुण

६. पुरुष व महिला यांच्यासाठी परेड करणे (४० गुण)

३. सुरक्षा एजन्सीने दिलेल्या सुरक्षा रक्षकांच्या यादी मधून विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी यांचे समोर शारिरीक क्षमता चाचणी घेऊनच सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांची निवड केली जाईल.

४. सुरक्षा एजन्सीने विद्यापीठ प्रक्षेत्र/विभागातील सुरक्षा व त्यासंबंधीची इतर सर्व कामे संबधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार पार पाडावीत. कामाच्या ठिकाणाबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी यांचे पुर्वपरवानगीशिवाय बदल करता येणार नाही व सदर बदल एजन्सीवर बंधनकारक राहील. सुरक्षा एजन्सीला विद्यापीठातील संबंधीत अधिकारी यांच्या सुचनेनुसार काम करावे लागेल. भविष्यामध्ये सुरक्षा पर्यवेक्षक, सुरक्षा रक्षक व सुरक्षा एजन्सी यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास त्यांचे वाद न्यायालयामध्ये किंवा न्यायालयाबाहेर मिटविण्याची जबाबदार सर्वस्वी संबंधित सुरक्षा एजन्सीवर राहील. या प्रकरणी विद्यापीठाचा कसलाही संबंध राहणार नाही.

५. महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडून सुरक्षा एजन्सीने पुरविलेल्या सुरक्षा रक्षक, सुरक्षा पर्यवेक्षक यांना कोणत्याही प्रकारचे गणवेश व इतर संबंधीत साहित्य दिले जाणार नाही. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांना गणवेश, रेनकोट, गमबुट उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित सुरक्षा एजन्सीची राहील. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांना गणवेश साहित्यामध्ये टॉर्च, शिट्टी, काठी व ओळखपत्र इ. साहित्य देणे सुरक्षा एजन्सीवर बंधनकारक राहील. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांनी परिधान केलेले गणवेश स्वच्छ व निटनेटके असावेत.

६. एखाद्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांचे काम असमाधानकारक आढळल्यास व तसे विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी यांनी कळविल्यास संबंधित सुरक्षा कर्मचाऱ्याला कामावरुन कमी करुन त्यांचे ऐवजी सुरक्षा एजन्सीला पर्यायी सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक नेमावा लागेल.

७. करारादरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठ आवारातील व प्रक्षेत्रातील अपघात, चोरी, मालमत्ता हानी, अतिक्रमण, गौण खनिज चोरी, वृक्षतोड, बियाणे प्लॉट नुकसान, यंत्र सामुग्री नुकसान, पशुधन इतर आकस्मित प्रसंगाची माहिती एजन्सीने त्वरीत विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांना व सुरक्षा अधिकारी यांना द्यावी व या काळात विद्यापीठ सक्षम अधिकाऱ्यांने समक्ष अथवा भ्रमणध्वनी/दुरध्वनी वरुन दिलेले आदेश एजन्सीला बंधनकारक राहतील.

८. सुरक्षा एजन्सीमार्फत पुरविलेल्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांचे वर्तन शिस्तबध्द/शिस्तीचे असावे. त्यांनी कामावर सतर्क रहावे. कामावर असतांना कामाची नेमुण दिलेली जागा विनापरवानगी सोडू नये. कामाच्या ठिकाणी अनुचित प्रकार घडल्यास कर्मचाऱ्यांने त्वरीत संबंधित अधिकाऱ्यांना व सुरक्षा अधिकारी यांना कळवावे. सुरक्षा एजन्सीच्या कर्मचाऱ्यांकडून विद्यापीठाची प्रतिमा डागाळणार नाही याची काळजी सुरक्षा एजन्सीने घ्यावी.

९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ आवारातील मालमत्तेचे व जीविताचे रक्षण करणे हे सुरक्षा एजन्सीचे प्रथम कर्तव्य राहील. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांच्या गैरहजेरीमुळे विद्यापीठाच्या मालमत्तेचे व कोणत्याही व्यक्तीच्या जीविताचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी सुरक्षा एजन्सीवर राहील. तसेच विद्यापीठ मालमत्तेची चोरी, नुकसान, जनावरांमुळे होणारे पिकांचे नुकसान इत्यादी बाबतची नुकसान भरपाई करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी सुरक्षा एजन्सीची राहील व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सुरक्षा एजन्सीने विद्यापीठास नोटरी समोर केलेले रु.५००/- चे स्टॅम्पवर सादर करावे लागेल.

१०. मुळ सुरक्षा एजन्सीला दुय्यम एजन्सी नेमता येणार नाही तसे आढळल्यास मुळ सुरक्षा एजन्सीचे कंत्राट रद्द करण्यात येईल सदर सुरक्षा एजन्सीची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

११. सुरक्षा एजन्सी व महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये वाद निर्माण झाल्यास तो अधिकृत विद्यापीठ प्रतिनिधी व सुरक्षा एजन्सी यांच्यामध्ये चर्चा करुन सोडविण्यात यावा. याबाबत अंतिम निर्णय मा.कुलगुरु महोदय घेतील व तो सुरक्षा एजन्सीवर बंधनकारक राहील. त्याच प्रमाणे सुरक्षा एजन्सीबाबचे न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास राहुरी न्यायालयाचे कक्षेत राहतील.

१२. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकाने कामवार १५ मिनिटे अगोदर कामावर हजर रहावे दररोज कार्यभार देणे घेणे बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. कर्तव्य ठिकाणाच्या मालमत्तेची व वस्तूंची लेखी नोंद ठेवावी. बदली कर्मचारी आल्याशिवाय कर्तव्य ठिकाण सोडू नये.

१३. सुरक्षा एजन्सीमार्फत रुजू होणाऱ्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांना सुरक्षा एजन्सीने ओळखपत्र द्यावे व सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सदर ओळखपत्र दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.

१४. सुरक्षा पर्यवेक्षकांनी दररोज गस्तीचा लेखी अहवाल सुरक्षा कार्यालयाकडे सादर करावा. तसेच दैनंदिन हजेरी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

संशोधन संचालक

... राहुरी

१५. सुरक्षा एजन्सीने नेमलेल्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांचे वेतन किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार करणे बंधनकारक राहील. सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांचे बँक खात्यामध्ये वर्ग करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक महिन्याचे वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती, कर्मचारी राज्य विमा निगम, कर्मचारी भविष्य निधी, वस्तु व सेवाकर (GST), व्यवसाय कर, घरभाडे, कामगार कल्याण निधी इत्यादी सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक त्यांचे योग्य त्या शासकीय खात्यावर जमा केल्याची नोंद व चलने सादर केल्या खेरीज पुढील महिन्याचे बिल अदा केले जाणार नाही. कर्मचारी भविष्य निधी अंतर्गत कामावर हजर होतानाच सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांचा (Universal Account number (UAN)) नंबर वर नोंदणी करणे व वारस नामनिर्देशन करणे आवश्यक आहे. नसल्यास आठ दिवसांचे आत Universal Account number (UAN) सुरक्षा एजन्सीने प्राप्त करुन अद्यावत करुन द्यावा लागेल.

१६. सुरक्षा रक्षकांच्या गैरहजेरीची माहिती सुरक्षा एजन्सीने दररोज सुरक्षा पर्यवेक्षकामार्फत सुरक्षा अधिकारी यांना लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील.

१७. संबंधित विभागाचे अधिकारी, विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी व पर्यवेक्षकांना तपासणीमध्ये सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक कामवार न आढल्यास, गणवेशात नसल्यास, झोपलेले आढळल्यास, त्याच्याकडे ओळखपत्र नसल्यास अथवा साप्ताहिक परेडला उपस्थित नसल्यास गैरहजेरी मांडण्यात येईल.

१८. सुरक्षा एजन्सीने विद्यापीठ आवारात अनाधिकृत व्यक्ती तसेच बाहेरील मोकाट जनावरे/पशुधन चारण्यासाठी येणार नाहीत/संचार करणार नाहीत याची काळजी घ्यावी.

१९. विद्यापीठ क्षेत्रातील जमिनीवर अतिक्रमण होणार नाही याची कळाजी सुरक्षा एजन्सीने घ्यावी. अतिक्रमण झाल्यास तात्काळ अतिक्रमण करणाराचे नावासह विद्यापीठाचे अधिकाऱ्यांस लेखी अहवाल सादर करावा.

२०. सुरक्षा एजन्सीच्या अधिकृत प्रतिनिधीचे एका महिन्यातून कमीत कमी तीन वेळा विद्यापीठ आवारात भेट देऊन सुरक्षा व्यवस्था सक्षम असल्याची खात्री सुरक्षा अधिकारी यांचे समवेत करावी व तसा लेखी अहवाल सुरक्षा अधिकारी यांना सादर करावा.

२१. आठ तासाची एक पाळी याप्रमाणे दिवसाच्या २४ तासांसाठी तीन पाळ्यामध्ये यादीतील प्रत्येक ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे आवश्यक आहे. त्यानुसार साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी पर्यायी सुरक्षा रक्षक पुरविण्याची जबाबदारी सुरक्षा एजन्सीची राहील.

२२. विद्यापीठ आवारातील सिक्युरीटी पॉईन्ट कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे व त्या अनुसरुन सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक कमी व जास्त करणे संबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील.

२३. सदर कामाचा करार संपुष्टात आणावयाचा झाल्यास सुरक्षा एजन्सीने तीन महिन्यांची लेखी पूर्व सुचना देऊन करार संपुष्टात आणता येईल.

२४. सुरक्षा एजन्सीने कामावर ठेवलेल्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकास रजेची आवश्यकता असल्यास तसा लेखी अर्ज संबंधित नेमणुक ठिकाणाच्या अधिकाऱ्याकडे सादर होणे आवश्यक आहे. तशी पुर्व सुचना सुरक्षा विभागास कळविणे आवश्यक आहे. विना अर्ज गैरहजर राहणाऱ्या सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षकांच्या गैरहजेरीची माहिती पर्यवेक्षक मार्फत सुरक्षा अधिकारी/संबंधित अधिकारी यांना लेखी देणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक विना परवाना गैरहजर राहिल्यास कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सेवा बंद करण्यात येतील.

२५. विद्यापीठाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

२६. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांनी कामावर असतांना मद्यपान/अंमली पदार्थ/नशापान/धुम्रपान करु नये.

२७. एजन्सीने नेमलेल्या सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांची हजेरी कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. त्यावर दररोज कामाच्या वेळेच्या सुरुवातीस सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांनी सही करणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या संबंधित अधिकारी/सुरक्षा अधिकारी/पर्यवेक्षक यांना केव्हाही हजेरी पत्रक तपासण्याचा अधिकार राहील व तपासणीमध्ये सुरक्षा रक्षक कामावार न आढळल्यास, मान्य गणवेशात नसल्यास अथवा त्याचाकडे ओळखपत्र नसल्यास गैरहजेरी मांडण्यात येईल.

२८. सुरक्षा पर्यवेक्षक यांनी सुरक्षा रक्षकांकडून काम करुन घेणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, गैरहजर सुरक्षा रक्षकांबद्दल माहिती संकलित करुन तेथे पर्यायी सुरक्षा रक्षकांची नेमणुक करणे. कोणत्याही परिस्थितीत सुरक्षा व्यवस्थेस बाधा येणार नाही याची खबरदारी घेणे व सुरक्षा अधिकारी/संबंधित अधिकारी यांचे सुचनेनुसार/आदेशानुसार कर्तव्य ठिकाणी आवश्यकता/जरुरीनुसार भेट देणे बंधनकारक असेल. त्याबाबत वेगळा मोबदला मिळणार नाही.

२९. सर्व सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक हे शारिरीकदृष्ट्या कणखर असावेत. विशेषत :गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना निर्भिडपणे सामोरे जाण्याची क्षमता त्यांच्यात असावी.

३०. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांचेवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसावा.

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

३१. निकडीच्या प्रसंगी आवश्यकतेनुसार इतर कामे सोपविणे अगर कर्तव्य ठिकाण बदलण्याचा अधिकार सुरक्षा अधिकारी/ संबंधित अधिकारी यांना राहील.

३२. एकाच सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकास एकाच दिवशी दोन शिफ्टमध्ये ड्युटी देण्यात येऊ नये.

३३. कामाच्या ठिकाणाच्या परिसरामधून बाहेर नेण्यात येणारी वस्तु, यंत्र सामुग्री किंवा उत्पादीत कृषि माल, कलमे रोपे, बियाणे, फुळे व इतर साहित्याची वाहतुक करण्यास विद्यापीठाचे सक्षम अधिकारी यांची अधिकृत पावती/परवानागी असल्याशिवाय आवाराच्या बाहेर जाण्यास परवानगी देण्यात येऊ नये. गेटपाससाठी एक स्वतंत्र फाईल करावी. तसेच एक स्वतंत्र नोंदवही ठेवावी व त्यात या वस्तु, यंत्र, माल इत्यादींची नोंद घ्यावी आणि ती नोंदवही वेळोवेळी सुरक्षा अधिकारी/संबंधित अधिकारी यांना सादर करावी.

३४. सुरक्षा एजन्सीने सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांची चारित्र्य पडताळणी मा. जिल्हा पोलिस अधिक्षक, अहिल्यानगर यांचे मार्फत करण्यात येऊन चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र सुरक्षा कार्यालयास सादर करावे. सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षकांची वैद्यकीय तपासणी ग्रामीण रुग्णालय, राहुरी यांचे मार्फत करण्यात येऊन वैद्यकीय अहवाल सुरक्षा कार्यालयास सादर करावा.

## क) इतर वित्तीय अटी व शर्ती :

१. ई-निविदा किंमत रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) ना परतावा शुल्क असुन स्वतंत्ररित्या ऑनलाईन पध्दतीने अदा करावी लागेल.

२. निविदाधारकांनी अर्जासोबत रु. २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) बयाणा रक्कम ऑनलाईन पध्दतीने जमा करावी लागेल.

३. ज्या सुरक्षा एजन्सीची ई-निविदा मंजुर होईल त्या निविदाधारकाने ई-नविदा मंजूर झाल्यानंतर सात दिवसांचे आत विद्यापीठाच्या कार्यालयीन वेळेत येऊन रितसर सुरक्षा कामाचा करारनामा महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ नुसार रु. १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख मात्र) पर्यंत रु. ५००/- व त्यापुढील प्रत्येकी रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये लाख मात्र) साठी रु.१००/- एवढया रकमेचे मुद्रांक शुल्क भरणा करणे बंधनकारक राहील. करारनामा सादर केल्याशिवाय कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही.

४. ज्या सुरक्षा एजन्सीचा सदर कामाचा ठेका मंजूर होईल त्या सुरक्षा एजन्सीला सुरक्षेच्या दृष्टीकोनातून **रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख मात्र) सुरक्षा अनामत (Secutiy Deposti) रक्कम रुपये रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) ऑनलाईन स्वरुपात व रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) बँक गॅरंटी (Bank Guarantee) स्वरुपात विद्यापीठाकडे जमा करावी लागेल. सुरक्षा अनामत रक्कम व बँक गॅरंटी सदर कामाचा ठोका मिळाल्याबाबतचा आदेश विद्यापीठाकडून प्राप्त झालेच्या दिनांकापासून १० दिवसांचे आत जमा करावी लागेल.** सदर दहा दिवसांच्या मुदतीत सुरक्षाएजन्सीने सुरक्षा अनामत (Security Deposit) व बँक गॅरंटी (Bank Guarantee) विद्यापीठाकडे जमा न केल्यास सदर कामाचा ठेका मंजूर केल्याबाबतचा आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल व निविदा अर्जासोबत जमा केलेली बयाणा रक्कम जप्त (Forfeit) केली जाईल. करार संपल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम नियमानुसार सुरक्षा एजन्सीला मागणी अर्ज केल्यानंतर ६० दिवसांचे आत बिनव्याजी परत करण्यात येईल.

संशोधन संचालक
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

| RATE BOQ | | | |
|---|---|---|---|
| Tender inviting Authority: | | | |
| Name of Service: Providing Security Services at MPKV, Rahuri on contract base for 11 months | | | |
| Name of Security Agency: | | | |
| **Sr. No.** | **Particulars** | **Zone-3 Security Guard** | **Zone-3 Security Supervisor** |
| 1. | BASIC | 8828.00 | 10440.00 |
| 2. | SPL. ALLOWANCE | 3900.00 | 3900.00 |
| 3. | **TOTAL 1+2** | **12728.00** | **14340.00** |
| 4. | HRA 5% ON 3 | 636.40 | 717.00 |
| 5. | **GROSS TOTAL 3+4=5** | **13364.40** | **15057.00** |
| 6. | **TOTAL** | **13364.40** | **15057.00** |
| 7. | PF 13.00% ON 3 | 1654.64 | 1864.20 |
| 8. | ESIC 3.25 % ON 5 | 434.34 | 489.35 |
| 9. | **TOTAL** | **15453.38** | **17410.55** |
| 10. | Service Charge in Rs. No. 9 | | |
| 11. | **TOTAL** | | |
| 12. | GST 18% No 11 | | |
| 13. | **TOTAL** | | |
| 14. | **Per Day/26 Days** | | |

Without GST Rate Per Day Security Guard

संशोधन संचालक
म.फु.कृ.वि., राहुरी

**मध्यवर्ती परिसर महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी (ता. राहुरी जि. अहिल्यानगर) व अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव (ता. जामखेड जि. अहिल्यानगर) या विभागाकरीता सुरक्षा सेवा पुरविणे बाबतचे ई-निविदा वेळापत्रक.**

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | वर्तमानपत्र ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करणे. | ०४/०८/२०२७ | ------------- |
| २. | ई-निविदा ऑनलाईन संकेत स्थळावर उपलब्ध | ०५/०८/२०२६ | ------------- |
| ३. | ई-निविदा निविदापुर्व बैठक.<br>दुपारी ३.०० वाजता | १०/०८/२०२६ | संशोधन संचालनालय,<br>प्रशासकिय इमारत,<br>मफुकृवि, राहुरी |
| ४. | ई-निविदा प्रक्रिया बंद करणे.<br>सायंकाळी ५.०० वाजता | १७/०८/२०२६ | ------------- |
| ५. | ई-निविदा तांत्रिक लिफाफा उघडणे व तपासणी.<br>सकाळी १०.०० वाजता | १९/०८/२०२६ | संशोधन संचालनालय,<br>प्रशासकिय इमारत,<br>मफुकृवि, राहुरी |
| ६. | ई-निविदा कागदपत्रांची छाणनी | २०/०८/२०२६ | ------------- |
| ७. | ई-निविदा दराचा लिफाफा उघडणे व दर वाटाघाटी<br>सकाळी ११.०० वाजता. | २१/०८/२०२६ | संशोधन संचालनालय,<br>प्रशासकिय इमारत,<br>मफुकृवि, राहुरी |

**संशोधन संचालक,**
**मफुकृवि, राहुरी**